निवडक महाराष्ट्र

बकरी ईदनिमित्त शांतता समितीची बैठक

जव्हार : जव्हार उपविभागातील पोलीस ठाण्यांतर्गत चेक पोस्ट सज्ज करीत, गोवंश तस्करी रोखण्यासाठी उपविभागीय पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. दरम्यान, बकरी ईददरम्यान कायदा व सुव्यवस्था राखावी, यासाठी उपाययोजना करण्यात आल्या असून, नागरिकांनी देखील पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी गणपतराव पिंगळे यांनी केले. आगामी बकरी ईद या सणासंदर्भात हिंदुत्ववादी संघटना, मुस्लिम संघटना, शांतता समिती, ज्येष्ठ नागरिक समिती व प्रतिष्ठित नागरिकांची सभा ही अनुक्रमे जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा व कासा या कार्यक्षेत्रात घेण्यात आल्या. शिवाय, गोवंश तस्करी होऊ नये यासाठी, वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. तर, वाडा तालुक्यातील कुडुस व वडवली गावात गस्त वाढविली आहे. त्याअनुषंगाने सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी यांचे मोबाईल क्रमांक देण्यात आले असून ११२ या नंबरचा वापर करून माहिती देण्याबाबत कळविण्यात आले. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गस्त वाढविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

उल्हासनगरात शिवसेना उबाठाचा पदाधिकारी कार्यकर्ता मेळावा

उल्हासनगर : लोकसभा निवडणुकीत धनशक्ती विरुद्ध जनशक्तीच्या लढाईत महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार यांना विशेषतः निष्ठावंतांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगरात तीन विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसण्यात आली आहे. उल्हासनगर, कल्याण आणि अंबरनाथमधील विधानसभा मतदारसंघामधील शेकडोच्या संख्येने उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना उपनेते संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत यांनी मार्गदर्शन केले.

जास्त नफा देण्याचे आमिष दाखवत १२ लाखांचा गंडा

भाईंदर : भाईंदर पूर्वेच्या शिवसेना गल्ली येथील संगम अपार्टमेंटमध्ये करिष्मा राजेंद्रप्रसाद गुप्ता ही तरुणी राहते. तिला ऑनलाईन गुंतवणूक करण्याचे टेलिग्रामवर तसेच मोबाईलवर सांगून ४० टक्के व त्यापेक्षा जास्त फायद्याचे आमिष दाखविले. त्यानुसार करिष्माने समोरच्यांच्या सांगण्याप्रमाणे दोन बँक खात्यात गुंतवणुकीसाठी म्हणून १२ लाख ४१ हजार रुपये भरले. याप्रकरणी एकूण नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करत आहेत.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर
कराडसह लोणंदच्या बाजारात गर्दी

१५ हजारांपासून १ लाख रुपयांपर्यंत बोकडांची विक्री

रामभाऊ जगताप /कराड

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण असलेला बकरी ईद (ईद उल अधा) सोम. १७ रोजी साजरा होत असल्याच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी कराडसह लोणंदच्या बाजारात बोकड खरेदीसाठी मुस्लिम बांधवांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळाले. १५ हजार रुपयांपासून १ लाख रुपये किमतीचे बोकड विक्रीसाठी आले होते. कराडमध्ये एका बोकडाची विक्री तब्बल एक लाख रुपयांना झाली आहे. एकाच दिवसात जवळपास शेकडो बोकडांचे खरेदी-विक्री व्यवहार झाले असून सुमारे पाच कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

बकरी ईद अर्थात ईद उल अधाच्या निमित्ताने मुस्लिम समाजात बोकडांची कुर्बानी देण्याची प्रथा आहे. त्यामुळे बकरी ईदच्या निमित्ताने गेल्या सुमारे महिनाभरापासून परिसरातील जनावरांच्या आठवडा बाजारांत मुस्लिम समाजाच्यावतीने मोठ्या प्रमाणात बोकड खरेदी केली जाते. अनेक मुस्लिम कुटुंबात तर सहा महिने ते वर्षभर आधीच बोकड खरेदी केले जाते. तसेच त्याचा पोटच्या मुलासारखा सांभाळ करून बकरी ईदच्या दिवशी त्याची कुर्बानी दिली जाते.

सोम. १७ रोजी बकरी ईद साजरी होणार असल्याने गुरुवारी झालेल्या कराडसह लोणंद येथे सर्वांत मोठा बोकडांचा बाजार भरला होता. या बाजारात सातारा, सांगली, रत्नागिरी, चिपळूण, कोल्हापूर, पुणे आदी जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने बोकड विक्रीसाठी आले होते. गावठी बोकडांसह बिट्टल, उस्मानाबदी, आफ्रिकन बोर आदी जातीच्या बोकडांच्या

कत्तलखान्यांची तपासणी

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण असलेला 'बकरी ईद' सोमवारी साजरा होत असल्याच्या अनुषंगाने गोवंशाची कत्तल होऊ नये,यासाठी बजरंग दलाच्या साताऱ्यातील कार्यकर्त्यांनी सातारा शहर पोलिसांकडे केलेल्या तक्रारीनुसार शनिवारी दुपारपासून रविवारी दिवसभर पोलिसांनी साताऱ्यातील सदरबाजार येथील कत्तलखान्यासह अन्य ठिकाणची तपासणी केली. मात्र यावेळी कत्तलखान्यात म्हैसवर्ग जनावरांव्यतिरिक्त अन्य जनावरे आढळून आली नसल्याचा निर्वाळा पोलिसांनी दिला आहे. मात्र साताऱ्याव्यतिरिक्त अन्य कत्तलखान्याची तपासणी केल्याची किंवा तेथे काही आक्षेपार्ह आढळून आल्याबाबतची कोणतीही माहिती सायंकाळी उशिरापर्यंत तरी हाती लागली नव्हती. त्यामुळे इतरत्र प्रशासनाने 'तो मी नव्हेच'चा पवित्रा घेतल्याचेच चित्र दिसून येत होते. दरम्यान,सोमवारी बकरी ईद असल्याने सोमवारी पहाटेपासून गोवंशाची कत्तल मोठ्या प्रमाणात होऊ शकते, यासाठी संबंधित ठिकाणच्या पोलीस व अन्य प्रशासकीय यंत्रणांनी सतर्क राहून कोणताही अनुचित प्रकार होऊ देऊ नये, अशी मागणी हिंदुत्ववादी संघटना व जनतेतून होत आहे. याबाबत काय कार्यवाही होणार याकडे लोकांच्या नजरा लागल्या आहेत.

लोणंदमध्येही रेकॉर्डब्रेक बोकडांची खरेदी-विक्री

लोणंद, ता खंडाळा येथेही गुरुवारी बोकड व बकरीचा रेकॉर्डब्रेक बाजार भरला होता. त्यामुळे येथील बाजाराला जत्रेचे स्वरूप आले होते. लोणंद बाजारातही कोट्यवधी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली. लोणंद बाजार समितीच्या बकरी व बोकड, जनावरांच्या गुरुवारच्या बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. पहाटेपासून बाजार आवारावर दुचाकी, चारचाकी व ट्रकमधून शेळी, मेंढी, बकरी व बोकडांची आवक येत होती. त्यामुळे या बाजारातही बकरी व बोकडांची सुमारे पाच, दहा, पंधरा ते वीस हजारांपासून एक लाखांपर्यंत विक्री झाली. एका बोकडाची किंमत एक लाखापेक्षा जास्त गेली होती तर आजच्या बाजारात सुमारे तीन ते चार कोटींची उलाढाल झाली असल्याचे लोणंद बाजार समितीचे सभापती सुनील शेळके यांनी सांगितले.

यात समावेश होता. १५ हजार रुपयांपासून १ लाख रुपये किमतीचे बोकड विक्रीसाठी दाखल झाल्याने मुस्लिम बांधवांनी खरेदीसाठी गर्दी केली होती. कराड येथे विक्रीसाठी आलेल्या बोकडांमध्ये एका बोकडाची चक्क एक लाखाला विक्री झाली. यावरून सध्या बोकडांच्या किमती गगनाला भिडल्याचे वास्तवही समोर आले.

साताऱ्यात सर्वाधिक १७० किलो वजनी बोकड

कराड : केवळ काही तासांवर येऊन ठेपलेला 'बकरी ईद' म्हणजेच 'ईद उल आधा' हा सण मुस्लिम बांधवांचा पवित्र सण आहे. यानिमित्ताने संपूर्ण देशात विविध जातीचे, देखणे, रुबाबदार, वजनी इतकेच काय डोक्यावरती चाँद असलेल्या बोकडाला मोठी मागणी असल्याने अशा बोकडांची जणू स्पर्धाच लागते. या अघोषित स्पर्धेत यावर्षीचा भारतातील सर्वात वजनी देखणा बोकडाचा मान साताऱ्यातील दस्तगीर बागवान यांनी तयार केलेल्या 'गुलाम ए मुस्तफा' या बोकडाला मिळाला. दस्तगीर बागवान यांनी तयार केलेल्या बोकडांची पायापासून कमरेपर्यंतची उंची चाळीस इंच व पायापासून शिंगापर्यंत उंची ही पाच फूट आहे. त्याची लांबी साडे पाच फूट आणि घोड्यासारख्या दिसणाऱ्या या बोकडाचे वजन तब्बल एकशे सत्तर किलो आहे. राजस्थान येथील कोटा जातीचा हा भारतातील सर्वात जास्त वजनी मोठा बोकड ठरला असून नुकतीच त्याची खरेदी पुणे येथील एका व्यक्तीने लाखोंच्या रकमेत केली आहे. बागवान यांनी आपल्या या लाडक्या बोकडाचे नाव 'गुलाम ए मुस्तफा' असे ठेवले आहे. 'गुलाम ए मुस्तफा' या बोकडाला वाढविण्यासाठी रोज दोन लिटर दूध, सुका मेवा, हिरव्या भाजी-पाला, सफरचंद, मका, हरभरा, विविध प्रकारच्या डाळींचे मिश्रण ही त्याची रोजची खुराक असते. शिवाय उन्हाळ्यात त्याच्यासाठी स्वतंत्र वातानुकुलीत (कुलिंग) व्यवस्था करावी लागते तर केव्हा आजारी पडल्यास जनावरांच्या डॉक्टरांमार्फत औषध-पाण्याची सर्व व्यवस्था केली जाते.

प्रवाशांच्या तक्रारी आल्यास कारवाई होईल - इंदुमती दुबे

कोल्हापूर : पुणे डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर इंदुमती दुबे यांनी रविवारी कोल्हापूर येथील श्री छत्रपती शाहू टर्मिनलसची पाहणी केली. यावेळी त्यांनी काही अधिकारी, कर्मचारी वर्गाची देखील झाडाझडती करत, सुरू असलेल्या कामासंदर्भात योग्य त्या सूचना देत, लोकांच्या तसेच प्रवासी वर्गाच्या तक्रारी येणार नाहीत याची काळजी घ्या, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल असा सूचक इशारा ही आजच्या कोल्हापूर पाहणी दौऱ्यात इंदुमती दुबे यांनी दिला.

कोल्हापूर रेल्वे स्थानकाची पाहणी

पुण्याच्या डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर इंदुमती दुबे यांनी श्री छत्रपती शाहू टर्मिनलसची चार तास पाहणी केली. कोल्हापूर येथे गतिशक्ती योजनेंतर्गत रेल्वेचे नूतनीकरण सुरू आहे. स्थानकाचा कायापालट आणि दुहेरीकरणचे काम गतीने करा, त्यावर योग्य ती देखरेख करा अशा सूचना दुबे यांनी यावेळी दिल्या.

या भेटीदरम्यान, रेल्वे प्रवासी संघटनाचे सदस्य शिवनाथ बियाणी यांनी महालक्ष्मी रेल्वेला जादा दोन डबे जोडावेत, एसी डब्यात अनेक गैरसोयी असून, आवश्यक त्या सुविधांचा प्रवाशांना अभाव आहे तो दूर करावा, तसेच आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे विशेष रेल्वे सोडावी, अशी मागणी केली. स्थानक दुरुस्तीचे काम सुरू असल्याने टॉयलेट, वॉशरूमची गैरसोय होत असल्याचे प्रवाशांनी लक्ष वेधले असता, ठेकेदारांना सूचना करू असे इंदुमती दुबे यांनी स्पष्ट केले.

जरांगेंवर पुन्हा उपोषणाची वेळ येणार नाही - उदय सामंत

छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या मागण्यांसंदर्भात राज्यसरकार सकारात्मक आहे. त्यांनी दिलेल्या मुदतीत सगेसोयऱ्याचा प्रश्न मार्गी लागेल आणि त्यांना पुन्हा उपोषण करावे लागणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

अंतरवाली सराटी येथे पाच दिवसांच्या उपोषणामुळे मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावली होती. यामुळे दोन दिवसांपासून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. उद्योगमंत्री सामंत यांनी जिल्ह्याचे पालक मंत्री तथा खासदार संदीपान भुमरे आणि शिवसेना प्रवक्ता आ. संजय शिरसाट यांच्यासह रुग्णालयात जाऊन जरांगे-पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यानंतर पत्रकारांशी बोलताना सामंत म्हणाले की, मी मुद्दामहून जरांगे-पाटील यांच्या तब्यतेची चौकशी करायला मुंबईहून आलो आहे

मराठा आरक्षणाप्रमाणेच सरकारसाठी जरांगे यांची प्रकृती देखील महत्वाची आहे. मराठवाड्यातील मराठा समाजाच्या कुणबी

नोंदणी तत्कालीन हैदराबाद स्टेटच्या गॅझेटमध्ये असल्याचे जरांगे-पाटील म्हणाले. या नोंदी प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यकता पडल्यास मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मी स्वतः हैदराबादला जाईन.

मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने केलेल्या कामाचे मनोज जरांगे यांनी कौतुक केले आहे. कुणबी नोंदी शोधण्यासाठी स्थापन संदीप शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, तसेच वंशावळ समितीला मुदतवाढ देणे, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी जरांगे-पाटील यांनी केली आहे. यासदंर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे सकारात्मक असल्याचे सामंत यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री संदीपान भुमरे आणि आ. शिरसाट यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई यांचेसमोर
सी.ए. (सीएए)/१३९/एमबी/२०२३ शी संबंधित सी.पी. (सीएए)/८५/एमबी/२०२४
कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात;
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३
च्या इतर प्रयोज्य तरतुदींच्या प्रकरणात;
आणि
एकत्रिकरणाच्या योजनेच्या प्रकरणात.
विलीस कंसल्टींग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित एक प्रायव्हेट कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय स्थित आहे आयथिंक टेक्नो कॅम्पस, ७वा मजला, ए विंग, पोखरन रोड क्र. २ लगत, इस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, ठाणे-४००६०७, धारक सीआयएन : यु४५४००एमएच२००७पीटीसी३१९९६९
...पहिली याचिकाकर्ता कंपनी/विभक्त कंपनी/हस्तांतरक कंपनी
डब्ल्यूटीडब्ल्यू ग्लोबल डेलिव्हरी अँण्ड सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित एक प्रायव्हेट कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय स्थित आहे प्लांट क्र. ६, गोदरेज अँण्ड बॉइस मॅ. कं. कंपाउंड, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००७९, धारक यु२३००एमएच१९९२पीटीसी०६६७२४
...दुसरी याचिकाकर्ता कंपनी/परिणामी कंपनी/हस्तांतरिती कंपनी

याचिकेच्या सुनावणीची सूचना

विलीस कंसल्टींग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि डब्ल्यूटीडब्ल्यू ग्लोबल डेलिव्हरी अँण्ड सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या मंजुरीकरिता कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ अंतर्गत याचिका २३.०४.२०२४ रोजी याचिकाकर्त्या कंपन्याद्वारे सादर करण्यात आली होती आणि दिनांक १४.०५.२०२४ रोजीच्या आदेशाद्वारे सन्माननीय न्यायाधिकरणाद्वारे दाखल करण्यात आली होती. सदर याचिका ०२.०७.२०२४ रोजी सन्माननीय न्यायाधिकरणासमोर सुनावणी आणि अंतिम निकालाकरिता निश्चित करण्यात आली आहे.
कोणीही व्यक्ती सदर याचिकेच्या बाजुने किंवा विरोध करण्यासाठी इच्छुक असल्यास याचिकेच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर याचिकाकर्त्या कंपन्यांच्या वकिलांकडे पोहोचेल अशा पध्दतीने त्यांचे/तिचे नाव आणि पत्त्यासह त्याच्या/तिच्या किंवा त्याच्या/तिच्या वकिलांद्वारे सही केलेली त्यांच्या हेतुची सूचना खालील नमुद पत्त्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडे आणि ४ था मजला, एमटीएनएल एक्स्चेंज बिल्डिंग, जी.डी. सोमानी मार्ग, जी.डी. सोमानी इंटरनॅशनल स्कूल जवळ, कफ परेड, मुंबई ४००००५ येथे राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणा, मुंबई खंडपीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. जेथे त्यांना/तिला याचिकेला विरोध करायचा आहे, विरोधाची पार्श्वभूमी किंवा त्याच्या/तिच्या शपथपत्राची प्रतअशा सूचनेसह पाठविणे आवश्यक आहे. याचिकेची प्रत कोणाही व्यक्तीला आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित प्रभार प्रदान केल्यावरयाचिकाकर्त्या कंपन्यांच्या वकिलांद्वारे पुरविण्यात येईल.
अश्लर लॉ
कार्यालय २०९, रिवा चेंबर्स, ३१, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०
दिनांक : १७.०६.२०२४ ठिकाण: मुंबई

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.
नोंदणीकृत कार्यालय: ५०१, सालकॉन ऑरम, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, नवी दिल्ली - 110025
सीआयएन: यु६५९००डीएल२०२०पीएलसी३६६०२७

लिलाव सूचना

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि. च्या खालील कर्जदारांना याद्वारे कळविण्यात येते की बँकेकडून त्यांनी सोने कर्ज घेतले आणि बँकेद्वारे जारी केलेल्या वैयक्तीक सूचनांसह विविध मागण्या आणि सूचना पाठवूनही त्यांनी समायोजित केलेले नाही. सर्व कर्जदारांना याद्वारे कळविण्यांत येते की बँकेकडे तारण म्हणून सोने दागिण्यांचा लिलाव करण्याचे ठरवले आहे आणि त्यानुसार **२७.०६.२०२४** रोजी **दु. ०३.०० वा.** हि तारीख जेथून कर्ज घेतले होते त्या शाखा परिसरात लिलावाची तारीख म्हणून निश्चित करण्यांत आली आहे. कर्जदार, खाते धारक आणि तमाम जनतेसह सर्व लिलावाच्या अटी आणि शर्तीनुसार सदर लिलावात सहभागी होऊ शकतात.

शाखा	खाते क्र.	खाते धारकाचे नाव	वडील/पती/पत्नीचे नाव	पत्ता	खाते उघडण्याची तारीख	देय
माजीवाडा ठाणे	103742510225	दिक्षा एम महाजन	मंगेश यांचा मुलगा	फ्लॅट क्र. सी३, ८०५ पूर्वरंग सोसायटी, संस्कृती शाळा, वाघोली तालुका हवेली, केसनंद समोर, पुणे महाराष्ट्र - ४१२२०७	20/01/2024	256,772.72
पुणे टिळक रोड	104242510287	अवधूत बी काळे	बाळासाहेब काळे यांचा मुलगा	प्लॉट क्र. बाळासाहेब काळे प्लॉट क्र. १३, चर्च रोड, शिवांजली लॉन समोर, भूषण नगर केडगाव, अहमदनगर, महाराष्ट्र - ४१४००१	17/02/2024	65,334.86
माजीवाडा ठाणे	103742510123	डायना आर फर्नांडिस	रुबेन यांचा मुलगा	२२०-ए, मधला वाडा देवबाग, सिंधुदुर्ग महाराष्ट्र ४१६६०६	09/01/2024	46,680.07
माजीवाडा ठाणे	103742510189	समीर के भोईर	जिजाबाई तुकाराम भोईर यांचा मुलगा	कानोभा मंदिर जवळ, घोटसाई घोटसाई ठाणे महाराष्ट्र ४२१६०५	18/01/2024	18,996.11
माजीवाडा ठाणे	103742510251	सृष्टी डी कोळी	दिगंबर कोळी यांचा मुलगा	लक्ष्मण हाऊस मानोरी कोळीवाडा बरक गॉल, मार्वे रोड सागर दीप सोसायटी जवळ, मनोरी गाव मालाड पश्चिम मुंबई (उपनगर) मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००९५	23/01/2024	41,139.67
पुणे टिळक रोड	104242510161	शितल एस मुंडे	सदाशिव मुंडे यांचा मुलगा	भादुवाडी, भादुरवाडी (एन.व्ही.) बीड बीड महाराष्ट्र ४३१५३०	27/01/2024	42,780.98
पुणे टिळक रोड	104242510178	गिरीश व्ही भंगाळे	गिरीश भंगाळे यांचा मुलगा	ए-५०१, जगताप डेअरी पुणे सिटी, पुणे महाराष्ट्र ४११०२७	31/01/2024	35,790.69
माजीवाडा ठाणे	103742510351	राजुभाई आर गुजर	रामकृष्ण यांचा मुलगा	ए-५०४ केदारनाथ नीलकंठ सृष्टी, केडीएमसी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मागे, वाडेघर कल्याण पश्चिम ठाणे महाराष्ट्र - ४२१ ३०१	06/02/2024	205,246.72
माजीवाडा ठाणे	103742510388	विवेक व्ही. गलग	वासुदेव गलग यांचा मुलगा	खोली क्र. १२, सप्तशृंगिणी वासिनी सोसायटी, मार्वे रोड सूर्यवंशी घराजवळ राठोडी, गाव मालाड पश्चिम मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००९५	09/02/2024	212,428.03
माजीवाडा ठाणे	103742510406	योगित एम पाटील	मधुसूदन यांचा मुलगा	२५, ममता कुटीर, महाकाली लेणी रोड तक्षशिला सोसायटी समोर, अंधेरी पूर्व मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००९३	13/02/2024	989,210.16
माजीवाडा ठाणे	103742510409	नितीन वाय लाड	यशवंत लाड यांचा मुलगा	बी/१७०३, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर जवळ, मुंबई बोरिवली (पू) मुंबई उपनगर महाराष्ट्र - ४०००६६	14/02/2024	179,760.00
माजीवाडा ठाणे	103742510456	शमसूज झेड खान	नूरुलहोदा खान यांचा मुलगा	ए२ डिसुझा सदन ए२ डिसुझा सदन टिळक नगर लिंक रोड मुंबई महाराष्ट्र - ४०००७२	17/02/2024	247,520.17
माजीवाडा ठाणे	103742510457	शमसूज झेड खान	नूरुलहोदा खान यांचा मुलगा	ए२ डिसुझा सदन ए२ डिसुझा सदन टिळक नगर लिंक रोड मुंबई महाराष्ट्र - ४०००७२	17/02/2024	212,907.94
पुणे टिळक रोड	104242510314	श्वेता तिवारी		डी १०३ कल्पतरु हार्मोनी वाकड ओसैन गंगा मॉलच्या मागे पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०५७	21/02/2024	34,390.64
पुणे टिळक रोड	104242510289	श्वेता तिवारी		डी १०३ कल्पतरु हार्मोनी वाकड ओसैन गंगा मॉलच्या मागे पुणे शहर पुणे महाराष्ट्र ४११०५७	17/02/2024	177,285.11

लिलाव तारीख २७.०६.२०२४ @ ०३.०० दुपारी आहे

बँकेने कोणत्याही पूर्वसूचना न देता लिलावातून कोणतेही खाते रद्द करणे किंवा लिलाव रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला.
प्राधिकृत अधिकारी, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

वसुली अधिकारी यांचेसमोर च्या आवारात
दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई
१ला मजला, पद्मावती दर्शन, एन्. एम्. जोशी मार्ग, लोअर परळ,
मुंबई - ४०० ०१३
फोन क्र. २४२१७७००/०१/०२/०३/०४ फॅक्स : २४२१७७०५

प्रपत्र 'झेड'
नियम १०७ चा पोटनियम ११ (डी-१) पहा)
स्थावर मिळकतीकरिता कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता दि सिटी को-ऑप बँक लि., मुंबईचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने **महाराष्ट्र को ऑपरेटीव्ह सोसायटी नियम १९६०** अंतर्गत २२ जुलै २०२० रोजी मागणी सूचना जारी केली आणि त्यानंतर २९ से सप्टेंबर २०२० रोजी न्यायनिर्णित कर्जदार म्हणजेच कर्जदार आणि हमीदार यांना जमी आदेशाची सूचना जारी केली.
मेसर्स खुशबू डायमंडचे प्रोप्रायटर श्री. महेश हिमतलाल परमार यांचे हमीदार श्री. भरतभाई कानजीभाई शाह आणि इतर न्यायनिर्णित कर्जदार यांनी मागणी सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **सीसी/२३८७ रु. ६७,८९,६२५.४१ आणि एमनीएलएन/२२ रु. १,१३,८९,२३९.०० एकूण रक्कम रु. १,८१,७८,८६४.४१ (रु. एक कोटी एक्याऐंशी लाख अठ्ठ्याहत्तर आठशे चौसष्ट आणि पैसे ४१ मात्र जून २०२० पर्यंतच्या व्याजासह)** आणि सदर सूचनेच्या तारखेपर्यंत वसुलीचे त्यावरील व्याज आणि इतर शुल्क परतफेड करण्यास न्यायनिर्णित कर्जदार अयशस्वी झाल्यामुळे, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील विवर्णित मिळकतीच्या जमीची सूचना जारी केली आणि मिळकत जप्त केली.
न्यायनिर्णित कर्जदार मेसर्स खुशबू डायमंडचे प्रोप्रायटर श्री. महेश हिमतलाल परमार यांचे हमीदार श्री. भरतभाई कांजीभाई शाह यांना रक्कम अदा करण्यात अपयश आल्याने न्यायनिर्णित कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या कलम १५६, सहवाचता महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६१ च्या नियम १०७ नुसार त्यांना मिळालेल्या अधिकारात श्री. भरतभाई कांजीलाल शाह यांच्या मालकीच्या येथे खाली वर्णन केलेल्या **ए/५०१, पंचशील क्र.१, सीएचएस लि., रहेजा टाउनशिप, क्वेरी रोड लगत, मालाड पूर्व, मुंबई-४०००९७** मिळकतीचा विशेष वसुली अधिकारी, मुंबई द्वारा दि सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांच्याकडून सांकेतिक कब्जा घेतला आहे.
विशेषत: न्यायनिर्णित कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना मिळकतीशी व्यवहार न करण्याबाबत सतर्क करण्यात येत आहे. आणि देवघेवीचा व्यवहार **रु. ४,०९,१८,८७८.०० (रु. चार कोटी नऊ लाख अठरा हजार आठशे अठ्ठ्याहत्तर मात्र मे २०२४ पर्यंत व्याजासह)** आणि त्यावरील जून २०२४ पासूनचे व्याज **दि सिटी को-ऑप. बँक लि., मुंबई च्या प्रभाराच्या** अधीन राहिल.
स्थावर मिळकतीचे वर्णन
ए/५०१, पंचशील क्र. १, सीएचएस लि., रहेजा टाउनशिप, क्वेरी रोड लगत, मालाड पूर्व, मुंबई-४०००९७
दिनांक : १३.०६.२०२४ **( )**
ठिकाण : मुंबई **वसुली अधिकारी**
रजिस्ट्रार ऑफ को-ऑप.डिपार्ट.
महाराष्ट्र शासन द्वारे अधिकार दिलेले

भाऊसाहेब रंगारी पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

पुणे : हिंदुस्थानातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे जनक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांच्या ११९ व्या पुण्यतिथीनिमित्त दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार आहे. 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'कडून हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गत वर्षीपासून 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'कडून या शालेय साहित्य वाटप उपक्रमाची सुरवात करण्यात आली आहे.

ट्रस्टचे विश्वस्त आणि उत्सव प्रमुख पुनीत बालन यांनी उपक्रमाची माहिती दिली. यावर्षी भोर आणि वेल्हे तालुक्यातील दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगर वस्ती (विंझर), कातकर वस्ती (विंझर), लिंबरवाडी (पाबे) आणि जोगवाडी (भोर) या शाळांमधील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षासाठी संपूर्ण शैक्षणिक साहित्य देण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला दप्तर, प्रत्येकी सहा वह्या, दोन पेन्सिल बॉक्स, जेवणाचा डब्बा, पाणी बॉटल, सँडल तसेच इतर आवश्यक साहित्य देण्यात येणार आहे. याशिवाय जोगवडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या पुरविण्यात येणार आहे.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरवात करून ब्रिटीश साम्राज्याविरोधात समाज एकत्र काम करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. अशा या क्रांतिकारकाच्या पुण्यतिथीनिमित्त दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत व्हावी, यासाठी शैक्षणिक साहित्य उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यातून गरजू विद्यार्थ्यांना मदत होऊन त्यांचे उज्वल भवितव्य घडेल असा विश्वास पुनीत बालन, उत्सवप्रमुख व विश्वस्त यांनी व्यक्त केला.

शेंडा पार्क परिसरात आयटी पार्क उभारणार

कोल्हापूर : शेंडा पार्क येथील कृषी आणि आरोग्य विभागाकडील जागा जिल्हा क्रीडा संकुल, प्रस्तावित नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, आयटी पार्क व अन्य शासकीय कार्यालयांसाठी मिळण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालक मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विषयांची आढावा बैठक झाली. यावेळी पालक मंत्री मुश्रीफ म्हणाले, कोल्हापुरात माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योगांची वाढ होण्यासाठी व स्थानिक युवकांना रोजगार मिळण्यासाठी शहरातील शेंडापार्क परिसरात आयटी पार्क उभारण्यात येणार आहे. यासाठी शेंडा पार्क येथील कृषी विभागाची जागा आयटी पार्कसाठी उपलब्ध झाल्यास आंतरराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक वाढण्यास मदत होईल.